Today गोंदिया

सकाळ

सोमवार १७ सप्टेंबर २०१८ | ३

# जनावरांचे 'आरोग्य व्यवस्थापन'वर भडंगा येथे प्रशिक्षण कार्यक्रम

**गोंदिया, ता. १६ :** हिवरा येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने गोरेगाव तालुक्यातील भडंगा येथे जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.



**गोंदिया : कार्यक्रमात बोलताना डॉ. एन. एस. देशमुख.**

कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. एन. एस. देशमुख यांनी जनावरांना होणाऱ्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. जनावरांचा गोठा स्वच्छ ठेवावा, त्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी द्यावे, गोठ्यातील माश्या व गोचीडांचे नियंत्रणाकरिता दर पंधरा दिवसांनी गोठ्यात डेल्टामेथ्रीन ०.०१ टक्के फवारणी करावी, असेही त्यांनी सांगितले. आर. डी. चव्हाण यांनी खोडकीडा व्यवस्थापनाविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच कीटकनाशकाची फवारणी दुपारी १२ वाजेच्या आत व सायंकाळी ४ वाजेनंतर करावी, असे सुचविले. या वेळी पशुसंवर्धन विभाग गोंदियामार्फत गायी, म्हशी, शेळ्या अशा सुमारे ४०० जनावरांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले.

कार्यक्रमात पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. आर. बी. सहारे यांनी जनावरांचे संगोपन व खाद्य व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. या वेळी पंचायत समितीचे डॉ. गजभिये, डॉ. एस. पी. गायगवळी, सरपंच उईके व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.